लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ६७ वा | सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना :- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दसऱ्यानंतर आचारसंहिता, दिवाळीनंतर मतदान

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता 12 ऑक्टोबरला आलेला दसरा उत्सव होताच कोणत्याही क्षणी लागू होईल आणि मतदान मात्र दिवाळीनंतर घेतले जाईल, असे स्पष्ट संकेत केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या पत्रकार परिषदेतून शनिवारी मिळाले.

ही निवडणूक एकाच टप्प्यात घ्या, अशी सर्वपक्षीय मागणी पुढे आली असली, तरी त्याबद्दलचा निर्णय आयोगाने घेतलेला नाही.

विधानसभेची मुदत 26 नोव्हेंबरला संपते, त्याआधी विधानसभा निवडणूक पार पडून नवी विधानसभा अस्तित्वात येईल, असे राजीव कुमार यांनी स्पष्ट केले. निवडणुकीच्या तारखांबाबत राजकीय पक्षांनी केलेल्या सूचनांचा संदर्भ लक्षात घेता 19 ते 21 नोव्हेंबरदरम्यान विधानसभेचे मतदान घेतले जाऊ शकते. त्यानुसार आचारसंहिता 18 ऑक्टोबरच्या आसपास लागण्याची शक्यता आहे. निवडणूक पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग दोन दिवसांपासून मुंबईत होता. या दौऱ्याचा समारोप करताना झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय







निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी विधानसभा निवडणुकीच्या तयारीची माहिती दिली.

राज्यातील राजकीय पक्षांनी आयोगासोबत झालेल्या बैठकीत दिवाळी, देव दिवाळी आणि छटपूजा हे सण टाळून निवडणुकीची तारीख निश्चित करावी, अशी विनंती केली आहे, असे राजीव कुमार म्हणाले.

मतदानाचा टक्का वाढावा म्हणून शनिवार-रविवार किंवा शासकीय सुट्टीच्या तारखा वगळून आठवड्याच्या मधल्या दिवसात मतदान घ्यावे, जेणेकरून मतदारांना साप्ताहिक सुट्टीला मतदानाची सुट्टी जोडून बाहेर जाता येणार नाही, अशीही विनंती राजकीय पक्षांनी केल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले.

यंदा 28 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबरदरम्यान दिवाळी साजरी होणार असून, 15 नोव्हेंबर रोजी देव दिवाळी आहे. छट महोत्सव 5 ते 8 नोव्हेंबरदरम्यान आहे. हिंदीपट्ट्यात देव दिवाळी आणि छट महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. या सणांसाठी गावाकडे जाण्यास मतदार प्राधान्य देतात. हे मतदार आपल्या गावी जाऊन परतण्याचा कालावधी लक्षात घेऊन तारीख ठरविली जाईल, असे दिसते. गेल्या विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने 21 सप्टेंबर 2019 रोजी पत्रकार परिषद घेऊन केली होती. मतदान हे बरोबर एक महिन्याने म्हणजे 21 ऑक्टोबरला, तर 24 ऑक्टोबरला मतमोजणी झाली होती. यावेळी नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात मतदान होणार असेल, तर एक महिन्यापूर्वी म्हणजे 18 ते 20 ऑक्टोबरदरम्यान निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे. ही पत्रकार परिषद होताच राज्यात आचारसंहिता लागू होईल.

### 19 ते 21 नोव्हेंबर मतदान होणे शक्य

देव दिवाळीनंतरचा आठवडा सोमवारी, दि. 18 नोव्हेंबरपासून सुरू होतो. सोमवारी वा शुक्रवारी मतदान घेतले तर मतदार शनिवार, रविवारच्या सुट्ट्या जोडून बाहेर पळतात, हा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे राजकीय पक्षांची विनंती लक्षात घेता आणि राज्यात मत टक्का वाढविण्यासाठी आयोगाचे सुरू असलेले प्रयत्न पाहता मंगळवार, दि. 19 ते गुरुवार, दि. 21 नोव्हेंबर या काळात निवडणूक आयोग मतदान घेऊ शकतो.

### टप्प्याबाबत योग्यवेळी निर्णय

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका या एका टप्प्यात घ्याव्यात, अशी मागणी सर्वच राजकीय पक्षांची आहे; पण याबाबत आपण आताच निर्णय घेऊ शकत नाही. योग्यवेळी त्याबाबत निर्णय घेतला जाईल. निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडल्या जातील, याची आम्ही दक्षता घेत असल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले.

# आरक्षण नसल्यामुळे अनेक मराठा कुटूंबांना आर्थिक फटका - खा. ओमराजे निंबाळकर

**वैराग (कटूसत्य वृत्त):-** प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापितांची अशी आरक्षणाची लढाई होत असून, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आरक्षण नसल्यामुळे अनेक मराठा कुटूंबांना आर्थिक फटका बसत असून मुलाबाळांचे शिक्षण पूर्ण करणे कठीण होत आहे. त्यामुळे समाजात असंतोष पसरला आहे, असे प्रतिपादन खा. ओमराजे निंबाळकर यांनी वैराग येथे केले. ते स्वर्गीय बाळासाहेब कोरके यांच्या ६७ व्या जयंती अभिवादन सोहळ्यात बोलत होते.



यावेळी निवृत्त न्यायाधीश मुकुंद सस्ते, शिवव्याख्याते प्रदीप सोळुंखे, किशोर मरकड, नाना खंदारे, विश्वंभर पाटील, विश्वास बारबोले, अनिल डिसले, आबा कापसे, मकरंद निंबाळकर, राजन जाधव, महादेव तळेकर, महेश गवळी, सज्जनराव साळुंखे, बापू अडसूळ, विनायक गरड, साहेबराव देशमुख, अरुण सावंत, प्रवीण काकडे, डॉ. सुरज चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, एक मराठा शेतकरी आपल्या मुलीच्या प्रवेशासाठी सर्वत्र फिरला मात्र प्रवेश फी भरू न शकल्यामुळे त्याने आत्महत्या केली. ही घटना फार वेदनादायी होती. याचाच धागा पकडून आरक्षणाला अडचण येते आहे. हे लक्षात येताच संसदेमध्ये सर्वप्रथम आवाज उठवणारा खासदार मीच होतो. आता या आरक्षण लढ्याला मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून सामान्यातील प्रामाणिक नेतृत्व लाभले आहे आणि ते व्यवस्थित पुढे जात असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाबाबत सचिव, न्यायाधीश यांच्यासमवेत शब्द दिल्यानंतर पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडावी लागत होती. मात्र याचे भान त्यांनी ठेवलेले दिसून येत नाही. उलट फसवणूक झाल्याचे दिसून येत आहे. लोकसभेच्या निकालानंतर खुर्चीकडे लक्ष ठेवून राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. आता ही लाडकी बहीण योजना आहे की, लाडकी खुर्ची योजना आहे हे कळण्यास मार्ग नसल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवव्याख्याते प्रदीप सोळुंखे म्हणाले की, रडायचं नाही लढायचं हे स्व. बाळासाहेब कोरकेनी शिकवले आहे. संघर्ष करणाऱ्यांच्या वाटेत नेहमी काटेच असतात मात्र या काट्यातून न थकता वाट काढणारा यशस्वी होतो. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्व बाळासाहेब (बप्पा) कोरके, याच बाप्पांचा वारसा आता दादा म्हणजे डॉ कपिल कोरके समर्थपणे पेलत आहेत. कोरकेनी महाराष्ट्रात शिक्षणाचे जाळे निर्माण करून ग्रामीण भागात घरोघरी शिक्षणाची गंगा पोहचविली. त्यामुळे त्यांचा शैक्षणिक वारसा खरोखरचं समाजाला दिशा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक शहाजी आगलावे यांनी तर उपस्थित मान्यवरांचा सन्मान संस्थेचे अध्यक्ष डॉ. कपिल कोरके यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार भाकरे, भिष्माचार्य ढवण यांनी केले तर आभार खंडेराया घोडके यांनी मानले.

## सोलापूर विमानतळाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण

# सोलापूर हवाई मार्गाने जोडले गेल्याने उद्योग व्यवसायाला चालना मिळणार - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी







**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नूतनीकरण झालेल्या सोलापूर विमानतळाचे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून दूरदृष्यप्रणाली पद्धत्तीने लोकार्पण झाले. सोलापूर जिल्हा विमान वाहतुकीने जोडला गेल्यामुळे येथील उद्योग व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. तसेच देश विदेशातील विठ्ठल भक्तांना दर्शनासाठी हवाई सुविधा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी सोलापूर विमानतळ येथे आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली उगले, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, माजी सनदी अधिकारी प्रवीण सिंह परदेशी, सोलापूर विकास मंचचे केतन शहा, माजी खासदार डॉक्टर जयासिध्देश्वर स्वामी, माजी आमदार नरसिंग मेंगजी यांच्यासह सोलापुरातील व्यवसायीक, उद्योजक विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, भगवान विठ्ठलाच्या आशीवार्दाने त्यांच्या भक्तांना हा उपहार मिळाला आहे. सोलापूर हे थेट एअर कनेक्टिव्हिटीशी जोडले गेले आहे. तिथल्या विमानतळाची सर्व प्रकारची क्षमता वाढवली असल्याने विठ्ठल भक्तांसह यात्रेकरूंना नवनवीन सुविधा मिळणार आहेत.

देश विदेशातून येणाऱ्या भक्तांना भगवान विठ्ठलाच्या दर्शनाला थेट सोलापूरला येता येणार आहे. यामुळे सोलापूर मध्ये व्यापार, व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वासही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

या कार्यक्रमाची सुरूवात श्रीमद्वीरशैव गुरूकुल होटगी मठ मधील विद्यार्थ्यांनी गणेश वंदन करून व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विमानतळ संचालक सी.एन. वंजारा यांनी केले तर आभार प्रदर्शन विमानतळ व्यवस्थापक चंपला बा यांनी केले.

# दक्षिण सोलापूर प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने 'आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक' पुरस्काराचे शानदार वितरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आपल्या हक्का बरोबर कर्तव्याची जाणीव ठेवत शिक्षणाची गंगा वाडी वस्तीवर पोहोचवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याच्या भूमिकेतून दक्षिण सोलापूर प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडीचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन दक्षिण सोलापूर चे माजी आमदार दिलीपरावजी माने यांनी केले. दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक, आदर्श शाळा व गुणवंत अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण समारंभ व मंद्रुप पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा विविध मान्यवरांच्या शुभहस्ते बहारदार वातावरणात संपन्न झाल्याची माहिती शिक्षक संघाचे अध्यक्ष महिबूबसाब सवार यांनी दिली. पुढे बोलताना सवार म्हणाले की,"दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने मागील कांही वषार्पासून पुरस्कार वितरण सोहळा शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी घेण्यात येत असून यंदाचे पुरस्काराचे हे बारावे वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.दक्षिण सोलापूर चे माजी आमदार दिलीपरावजी माने यांच्या शुभहस्ते आणि राज्य संघाचे जेष्ठ सल्लागार बाळासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली व सोलापूर डि. सी.सी.बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे, सोलापूर जि.प.चे सदस्य अमर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ



दुपारी तीन वाजता संपन्न झाला. या भव्य दिव्य पुरस्कार वितरण समारंभासाठी ज्येष्ठ शिक्षक नेते शिवानंद भरले, उत्तमराव जमदाडे, गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सरस्वती भालके, विद्याताई जगताप, सोलापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, सरचिटणीस रामभाऊ यादव, संचालक शिवाजी पाटील, मंद्रूप पतसंस्थेचे अध्यक्ष सुनील बिराजदार, सिद्राम कटगेरी, रेवणसिद्ध हत्तुरे, दयानंद वठारे, म.ह्यात पाटील, काळप्पा सुतार, बालाजी गुरव, हमिदखान पठाण, बसवराज खिलारी, अप्पाशा उंबराणी, गुरुबाळा सनके, आदी मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील एकूण १३ केंद्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे १३ शिक्षक अक्कलकोट तालुक्यातील १,एक उर्दू व एक कन्नड अशा १५ शिक्षकांचा व ४ गुणवंत अधिकारी व कर्मचारी यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

### गुणवंत शिक्षक

जाकेराबी अब्दुल कादर मुलाणी (शिरवळ), श्री.रविंद्र शिवशरण पाटील (नांदणी), श्री.रेवप्पा मलकप्पा बिराजदार (तेलगाव), श्रीम.सोनाली अनिलकुमार कोरे (धोत्री), श्रीम. शोभा सूर्यकांत काटकर(हत्तूर), सौ.मंगल बसवराज कोनापूरे (औज आ.), श्री.सुरेश शिवप्पा डफळे (मनगोळी), श्री.मल्लिकार्जुन तमण्णा तामदंडी इसरगुंडे पाटील वस्ती (कुंभारी), श्रीम. सोनाली विठ्ठल कदम (कारकल), श्री.संजय निंगाप्पा राजमाने (मंद्रुप), शेकप्पा सिद्राम गाजूल(हरणाट तांडा मुस्ती), श्रीम.संगिता विठ्ठल रोडगे (उळे), श्रीम.कविता सतीश कोकाटे (वळसंग), सौ.हिरामणी गणेश कोमारी (म्हैसलगे - ता. अक्कलकोट), श्रीम.महेजबीन गोलीवाले (विडी घरकुल अ कुंभारी), सौ.गंगाबाई गुरबसय्या मठपती (तीर्थ)

### गुणवंत अधिकारी व कर्मचारी

मल्हारी बनसोडे (ग. शि.अ.पंचायत समिती,दक्षिण सोलापूर), नागनाथ कल्लय्या स्वामी (केंद्र प्रमुख केंद्र-होटगी), संजय धोंडप्पा कोळी (पं.स.दक्षिण सोलापूर), संतोष बाबुराव मुरुमकर (पं. स.दक्षिण सोलापूर), दिपक उध्दव सोनवणे (जिल्हा परिषद,सोलापूर)

### आदर्श शाळा

जि.प.प्राथमिक मराठी शाळा, बोरामणी, जि.प.प्राथमिक मराठी शाळा, आलेगाव, जि.प.प्राथमिक मराठी शाळा, भीमनगर मंद्रुप, जि.प.प्राथमिक मराठी शाळा, आनंदनगर(हत्तूर)

### इतर विशेष सत्कार

राहुल सुरवसे गुळवंची (राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार), चंद्रकांत बाबुराव सुरवसे यत्नाळ(जिल्हा आदर्श शिक्षक), जिनेदबाशा हुसेनसाब नदाफ टाकळी (जिल्हा आदर्श शिक्षक (शिष्यवृत्ती)

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजकुमार बिज्जरगी, प्रकाश कुंभार, सुभाष फुलारी, मल्लिनाथ पुजारी, भिमराव पाटील, डॉ.नागनाथ येवले, केदारनाथ चौगुले, शिवय्या मसुती, शशिकांत चव्हाण, सतीश वाले, वसीम शेख, सिद्धाराम विजापुरे, गुरूबाळा बगले, विजयकुमार बिराजदार, विजयकुमार बबलेश्वर, चनमलप्पा चिट्टे, संजय मंगरूळे, चिनगीबादशहा कोटनाळ, सुरेश डफळे, म.हयात पाटील, बा. दा.मुल्ला, रब्बीलाल मुल्ला, बसवराज बनपुरे, हमीदखा पठाण, प्रकाश धुरुपे, महादेव कमळे, विनोद कोळी, मंजूनाथ भतगुणकी, काशिनाथ विजापुरे, सतीश पटेद, महादेव पाटील, संजय देवकते, संजय मंगरूळे, शांतप्पा कांबळे, शशिकांत पाटील, शिवशरण म्हेत्रे, श्रीशैल सुतार, पिरप्पा हडपद, सिध्दाराम स्वामी, मल्लिकार्जुन स्वामी, महादेव स्वामी, पंचय्या स्वामी, श्रीशैल बिराजदार (विंचूर) श्रीशैल बिराजदार (ह.कुडल), अपेक्षा रणदिवे, वैशाली हडलगी, अनिता गंभीरे, अंजली जमखंडीकर, अलका कदम, प्रज्ञा लासुरे, योजना पाटणे, जयश्री मराठे, पार्वती तोळनुरे, रेखा स्वामी, बद्रुन्निसा सगरी, अंजली नाटेकर आदी सर्व शिक्षक बांधवांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली जमखंडीकर व सतीश वाले यांनी तर आभार मल्लिनाथ पुजारी यांनी मानले.

# ज्ञानाची भूक ग्रंथालये पूर्ण करतात- विजय कोलते

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रंथालय चालविणे म्हणजे चांगला कार्यक्रम करून चांगला संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा उत्तम मार्ग आहे. ग्रंथालयाने समाजाचा पाठिंबा घ्यावा. आंदोलन करणारा वाचक हवा. ज्ञानाची भूक असणारे लोक जोडावे. सामाजिक क्षेत्राशी जोडून घ्यावे. असे उद्गार श्री विजय कोलते, अध्यक्ष पुणे विभाग ग्रंथालय संघ, पुणे यानी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर आणि श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत काढले. शनिवार दि. 28 सप्टेंबर 2024 रोजी किर्लोस्कर सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर येथे ही कार्यशाळा संपन्न झाली. मा. अशोक गाडेकर ग्रंथालय संचालक, मुंबई यांच्या शुभहस्ते व मा.डॉ गजानन कोटेवार अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला. यावेळी बोलताना महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांनी आपण फार वाईट परिस्थितीतून जात आहोत. गुंतवणूक करणे सर्वांना शक्य नाही. सामान्य माणसासाठी विधायक काम करणारे ग्रंथालय आहे. संघर्ष सुरू आहे. ग्रंथालयांच्या समस्या सुटल्या पाहिजेत असे वक्तव्य यावेळी बोलताना आपल्या मनोगतात केले. प्र. ग्रंथालय संचालक श्री अशोक गाडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सोलापूर



जिल्ह्यात एकमेव अभ्यासिका अत्याधुनिक आहे. जिल्हा ग्रंथालय संघाची स्वतःची इमारत महाराष्ट्रामध्ये फक्त सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाची आहे. संघाने मला पुरस्कारही दिलेला आहे. ग्रंथालयाच्या समस्या सोडविण्यासाठी मी ग्रंथालय संचालक या नात्याने पुरेपूर प्रयत्न करीत आहे. यावेळी श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष श्रीकांत येळेगावकर, सहाय्यक ग्रंथालय संचालिका, पुणे, श्रीमती शालिनी इंगोले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा - 2024 या परीक्षेत प्रथम आलेल्या तीन विद्यार्थिनींचा, रोख रक्कम, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दांडपट्टा खेळात विश्वविक्रम केल्याबद्दल कुमार छत्रवीर पवार यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी सार्वजनिक ग्रंथालयासाठी असणारे अभिलेख, राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठां नच्या योजना, इ ग्रंथालय ग्रंथालय इत्यादी बाबतची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी मा. सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सोलापूर, मा.प्रमोद पाटील, ग्रंथालय निरीक्षक, सोलापूर, श्री राम मेकले, अध्यक्ष, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ, मा. वंदना काटकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, लातूर, प्रदीप गाडे, वरिष्ठ लिपिक, विजयकुमार पवार, गुलाबराव पाटील अन्सार शेख, साहेबराव शिंदे, सौ. सारिका मोरे, सौ सारिका माडेकर, गीतांजली गंभीरे दीपा नरखेडकर, राजश्री माशाळकर इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब चटे, सोहळे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील साडेचारशे वाचनालयाचे कार्यकर्ते व सेवक यावेळी उपस्थित होते या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ चे अध्यक्ष ग्रंथ मित्र विजयकुमार पवार कार्यवाह साहेबराव शिंदे यांच्यासह सर्व पदाधिकारी संचालक मंडळ सेवक सौ वृषाली हजारे सौ.सारिका माडीकर सारिका मोरे सौ राजश्री माशाळकर सौ नंदा कुरले सौ दीपा नरखेडकर यांचे सहकार्य लाभले. उपस्थितांचे आभार अन्सार शेख यांनी मानले

## संपादकीय

# प्राणाशी गाठ

केंद्रीय औषध नियंत्रण संघटना अर्थात 'सीडीएससीओ'ने त्यांच्या अहवालात धक्कादायक माहिती दिली आहे. देशात वापरात असलेली 50 पेक्षा अधिक औषधे मानक दर्जाची नसल्याची त्यांनी घोषित केले आहे. ही औषधे त्यांनी गुणवत्ता आणि सुरक्षेच्या अनुषंगाने घेतलेल्या चाचणीत अपयशी ठरली आहेत. पॅरासिटामॉल, पॅन डी आणि कॅल्शियम सप्लिमेंट्ससह जी इतर औषधे आपल्याकडे अगदी सहजपणे घेतली जातात अथवा उपलब्ध होतात त्यात त्रुटी आढळून आली आहे. त्यावरून एकच बाब स्पष्ट होते की औषधांचे सेवन करणेही आता धोक्याचे बनले आहे. त्यातून प्रसंगी प्राणाशी गाठ पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. रुग्णाचा मग तो अगदी साध्या तापाचा रुग्ण असो अथवा दुर्धर आजाराने ग्रस्त असलेला रुग्ण असो पहिला विश्वास डॉक्टरांवर असतो. डॉक्टरांचा शब्द त्याला मोठा मानसिक आधार असतो. बऱ्याच रुग्णांचे 50 ते 80 टक्के आजारपण त्यातून बरे होते. उर्वरित काम त्यांनी दिलेली औषधे करतात. काही औषधे अशीही असतात की डॉक्टरांच्या सल्ला न घेताच पूर्वानुभवावरून घेतली जातात. घरातली एखादी ज्येष्ठ व्यक्ती किंवा सहकारी अथवा मित्र त्यांच्या अनुभवावरून एखाद्या गोळीचे अथवा सीरपचे नाव सुचवतात आणि ते औषध घेतले जाते. सामान्य पोटदुखी, सर्दी, खोकला अथवा कणकण जाणवणे यावेळी लोक असे प्रयोग करतात. बहुतेक वेळा ओळखीच्या औषधालयातून त्या विक्रेत्याच्या सल्ल्यानेही ती घेतली जातात. हे सर्रास झाले आहे. असे सगळे कथितपणे सुखेनैव सुरू असताना जर 50 पेक्षा अधिक औषधे चाचणीत अपयशी ठरल्याची बातमी येत असेल तर स्थिती गंभीर आहे. बरे ज्या औषधांची नावे समोर आली आहेत त्यातील काही सामान्य ॲसिडीटी अथवा तापासाठी घेतली जातात.

ती इतकी परिचित नावे आहेत की बहुतांश वेळा डॉक्टरांना न विचारताच मनानेच घेतली जातात. याचा अर्थ जी औषधे आजारावरील उपचार म्हणून घेतली जात असल्याचा दावा केला जात होता, तीच औषधे अन्य कोणत्या धोक्याची वाहक होती का? तशी जर ती होती, जे आता सिद्ध झाले आहे, मग विकली कशी जात होती? गेल्या महिन्यातही दीडशे औषधांवर बंदी घातली गेली. त्यात प्रामुख्याने प्रतिजैविके अर्थात ॲंटीबायोटिक्स, मल्टीव्हिटॅमिन, वेदनाशामक म्हणजे पेनकिलर आणि सर्दी तापासाठी घेतल्या जाणाऱ्या औषधांचा समावेश होता. या औषधांचे सेवन आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे त्यावेळी सांगितले गेले. गेल्या वर्षी आफ्रिकेतील एका देशात खोकल्याच्या एका औषधाबाबत धक्कादायक बातमी आली होती. भारतात एका ज्येष्ठ उद्योगपतीने त्यांच्या क्षेत्राशी संबंध नसलेल्या या बातमीकडे एका कार्यक्रमात लक्ष वेधले होते. संबंधित औषधामुळे त्या देशात 78 लहान मुलांच्या मूत्रपिंडाला धोका निर्माण झाला होता. यातील 66 दुर्दैवी बालकांचा त्यामुळेच मृत्यू झाला. यातील बहुतांश मुले दोन वर्षांपेक्षा कमी वयाची होती. तेथील आरोग्य अधिकाऱ्यांना त्यांच्या तपासणीत एका बाबीची शंका आल्याने त्यांनी तातडीने दोन औषधांचा वापर थांबवण्याचे निर्देश दिले होते. विशेष म्हणजे त्यात पॅरासिटामॉलचा आणि एका सीरपचा समावेश होता. जी भारतातही दिली जातात आणि साधारण त्याच वयोगटातल्या मुलांसाठी ती वापरली जातात.

त्यावेळी करण्यात आलेल्या तपासात ही औषधे भारतातील एका कंपनीकडून आयात केली गेल्याचे आढळून आले होते. या कंपनीच्या चार उत्पादनांमध्ये मानवासाठी विषारी असणारे आणि मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकणारे घटक आढळून आले होते. गदारोळ झाल्यानंतर भारतातील औषध नियामकांनी चाचण्या घेतल्या. त्यांना संबंधित औषधांमध्ये कोणतेही अयोग्य घटक आढळले नाही आणि त्यांनी क्लीन चिट दिली. यात लाचखोरीचा प्रकार झाल्याचा दावाही करण्यात आला.

पुढे काय झाले ते समोर आले नाही, मात्र आता एवढ्या मोठ्या प्रमाणात औषधे चाचणीत अपयशी ठरल्याची बातमी आली. आता प्रश्न असा आहे की या यादीत ज्या औषधांचा उल्लेख आहे त्यांचे सेवन किती जणांनी केले असणार आणि त्यांच्या आरोग्यावर त्याचा काही विपरीत परिणाम झाला असेल का? विशेष गोष्ट म्हणजे या ज्या गुणवत्ता चाचण्या घेतल्या जातात त्यांच्या निष्कर्षांना संबंधित औषध निर्मात्या कंपन्याही फारसे महत्त्व देत नसल्याचेही आढळून येते. आफ्रिकेतील देशाचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. चौकशीच्या रडारवर आलेल्या कंपन्यांकडून पुन्हा एकदा स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे. सर्वसामान्य लोकांना त्यांच्याबाबत सावध करण्याचे आले आहे. हा केवळ सोपस्कार आहे. त्यातून प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत आणि कोणाचे नुकसान झाले असेल तर त्याचा दोष कोणाच्या माथी? गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरल्यानंतर आणि विक्रीवर बंदी घातली गेल्यानंतरही काही औषधांची बाजारात विक्री सुरू असते. ती ग्राहकांना उपलब्ध असल्याचीही यासंदर्भातील बातम्यांवरून स्पष्ट होते. गेल्याच आठवड्यात राजधानी दिल्लीतच मुदत संपलेल्या औषधांची विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले होते. यातून एकच बाब अधोरेखित होते की प्राण वाचवणारा हा व्यवसाय प्राणाला संकट निर्माण करणाराही ठरला आहे आणि ज्या बाबींची मनाई करण्यात आली आहे त्या बाबींची विक्री करण्यास खालच्या स्तरावर म्हणजे दुकानांच्या स्तरावर देखरेख करणारी यंत्रणाच उपलब्ध नाही आणि ती जर असेल तर तिला हे प्रकार रोखण्यात अपयश आले आहे.

# ऊँची-ऊँची बातों से किसी का पेट भरता नहीं

अरे हे ऊँची-ऊँची बातों से
किसी का पेट भरता नहीं
अरे हे है राम का भरोसा जिसे
कभी भूखा मरता नहीं...

हे मि. नटवरलाल सिनेमातील गीत अमिताभ बच्चन आणि रेखा यांच्यावर चित्रित केले आहे. जीवनाचा एखादा अवघड नियम सहज सोप्या पद्धतीने सांगताना कधी कधी सीनेगीते, अभंग, ओव्या आणि इतर लोकगीते शंभर व्याख्यानांचं काम चार ओळीत करतात. माणसाकडे काही गुण आणि काही अवगुण त्याला उपजतच मिळतात. तर काही गुण-अवगुण दुसऱ्यांकडून पाहून नकळत तो घेत असतो.

स्वतःची स्तुती दुसऱ्याच्या तोंडून ऐकायला प्रत्येकाला आवडतं.राजे महाराजांच्या काळात तर यासाठी स्तुतीपाठक असायचे. ते राजाच्या पुढे मागे सतत रेंगाळत राहायचे. राजाच्या प्रत्येक कृतीवर ते त्यांची तोंड भरून स्तुती करायचे. राजा खूश व्हायचा अन त्या स्तुती पाठकाला बक्षीस मिळायचं. आधुनिक काळात राजकीय नेते मंडळींच्या आजूबाजूला असणारे त्यांचे चेले-चपाटे किंवा चमचे हे स्तुतिपाठकांची भूमिका वटवत असतात. तसं स्तुती करणे ही वाईट गोष्ट नाही, परंतु दुसऱ्याची खोटी स्तुती करणं मात्र टाळलं पाहिजे! खऱ्या स्तुतीमुळे काम करणाऱ्या व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो, त्याला प्रोत्साहन मिळतं ; तर खोट्या स्तुतीमुळे तोच व्यक्ती दुराचारी, दुराग्रही आणि दुराभिमानी होऊ शकतो...

ज्याची स्तुती करण्यास कोणीच पुढे येत नाही,तो मात्र आत्मप्रौढी करताना दिसतो. मी होतो म्हणून हे शक्य झालं... मी तर सांगितलं म्हणून झालं... माझं कसं सगळं परफेक्ट असतं...माझा नाद कोणी करत नाही... मी चांगल्याला चांगला, अन वाईटला वाईट हाय....अशी अनेक वाक्ये ऐकल्यानंतर आपल्याला बोलणाऱ्याच्या आत्मप्रौढीची प्रचिती येते.

आत्मप्रौढी करणे म्हणजे चार चौघात स्वतःला सर्वश्रेष्ठ समजणं. स्वतःची पाठ स्वतः थोपटून घेणं. स्वतःला सर्व शक्तिमान समजणं. स्वतःबद्दल अवास्तव समज करून घेणं... मग आत्मप्रौढी मिरवणाऱ्याचे आत्मभान जागं करावं लागतं!

पुरुषी अहंकारातून काही पुरुष मंडळी आपल्या जवळच्या महिला वर्गा पुढे आत्मप्रौढी करताना सर्रास दिसतात. पत्नी, आई आणि इतर महिलांसमोर आत्मप्रौढी मिरवणाऱ्यांची फटफजिती झाल्याशिवाय राहत नाही. महाभारतात स्वकर्तृत्वाच्या, स्वपराक्रमाच्या घोषणांनी आकाशपाताळ दणाणून टाकणारा राजपुत्र उत्तर कौरवांचे सैन्य पाहून गर्भगळीत होतो. पराक्रमाच्या मोठ्या गप्पा मारणारा उत्तर बाळाची सत्याचा सामना करताना मात्र बोबडीच वळते.

उत्तर हा मत्स्य नरेश विराट राजाचा मुलगा! याच विराट राजाच्या आश्रयास राहून पांडवांनी अज्ञातवासाचा कालावधी व्यतीत केला होता. अर्जुनाने घेतलेले स्त्रीरूप (बृहन्नला नामक महिला नृत्य प्रशिक्षका), सैरंध्री म्हणजे द्रौपदी आणि उत्तरा (जी पुढे अभिमन्यूची पत्नी होते) या सर्व बायकांत बसून उत्तर पराक्रमाच्या मोठ्या मोठ्या घोषणा करू लागला, उथळ बडबड करू लागला, मात्र भीष्म, द्रोण, कर्ण यांच्यासारखे योद्धे पाहून एकदम त्याची वाणी बदलली आणि फजिती झाली.

याचे वर्णन मोरोपंतांनी आपल्या काव्यातून खूप मार्मिक पणे केले आहे...

कुरुकटकासि पहातां तो उत्तर
बाळ फार गडबडला,
स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु
बायकांत बडबडला...

पुढे हाच उत्तर अंतिम युद्धाच्या पहिल्याच दिवशी पांडव सैन्याकडून लढताना शल्य राजाकडून कुरुक्षेत्रावर धारातीर्थी पडला, असे महाभारत सांगते...

रामायणात जे आढळून येते ते समाजात कुठे पाहायला मिळत नाही; कारण रामायण आदर्शवाद मांडते. पण महाभारत मात्र तसे नाही ! महाभारतात ते सर्व आहे, जे आजही समाजात आपल्याला पाहायला मिळते. प्रसंग तेच असतात, फक्त पात्र बदलतात. उत्तरा सारखी आत्मप्रौढी मिळवणारे आणि स्वतःची फटफजिती करून घेणारे आपल्याला अनेक पाहायला मिळतात.

खरंतर आत्मप्रौढी मिरवण्यापेक्षा आत्मपरीक्षण करणं व्यक्तिगत जीवनात लाभदायक ठरतं. मागील काळात माझे व्यक्तिमत्व कसे होते? आता त्यात कोणकोणते बदल झाले आहेत... पूर्वी माझी आर्थिक परिस्थिती कशी होती, आता कितपत मी प्रगती साधली आहे ? माझा सामाजिक दर्जा पूर्वीपेक्षा आता कितपत वाढला किंवा बिघडला आहे... माझी विश्वासार्हता आहे का नाही? माज्यात चांगले गुण कोणते आहेत? वाईट कोणते आहेत?... माझे बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य किती आहे?... यावर सतत आत्मशोध घेतला पाहिजे.स्वतःचे वस्तुनिष्ठ, खरेखुरे मूल्यमापन जगात फक्त आपण स्वतःच करू शकतो. आत्मप्रौडी मिरवण्यापेक्षा आत्मभान जागं होणं फायद्याचं ठरतं!



-किशोर जाधव, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

## प्रबोधन

# निष्क्रियता महा। खादाड

माणसाचा कल स्वाभाविकपणे काम करण्याकडे असतो की, काम टाळण्याकडे असतो? काही देशांतील लोक उद्योगी आहेत यात वाद नाही. पण बऱ्याच देशांतील नेत्यांना आपल्या प्रजाजनांना आराम हराम है किंवा एकच जादू सपाटून काम असे संदेश ऊठसूट का द्यावे लागतात? Work is workship हा इंग्रजीतील विचार बिगर इंग्रजी प्रदेशातील भारतीय, पाकिस्तानी, आफ्रिकन अशा लोकांनाच अधिक लागू पडतो. कारण इंग्लंड, फ्रान्स इत्यादी युरोपियन देशांचे आणि अमेरिका, रशिया, जपान इत्यादी देशांचे नागरिक मुळातच उद्योगशील आहेत. जपानी कामगाराला सक्तीने सुट्टीवर पाठवावं लागणं; हा मानवी उद्यमशीलतेचा उच्चबिंदू असला, तरी तो अपवादच आहे. पण जगभराचा सर्वसाधारण कल मात्र आराम करण्याकडेच असतो. म्हणून तर पाश्चात्त्य विद्वान इमर्सन म्हणतात, 'आळसाने गंजण्यापेक्षा कष्टाने झिजणं फार चांगलं!' जगप्रसिद्ध लेखक टॉलस्टॉय हे स्वतः मूळचे सरंजामदार असले, तरी त्यांचा प्रगतिशील विचार समाजवादाकडे जाणारा होता. ते म्हणतात, 'काहीही न करण्यापेक्षा काहीतरी करणं चांगलं! कारण कर्तव्य किंवा काम न करणाराच सर्वात मोठा पापी असतो. '

जगातील सारे थोर पुरुष कर्मवीरच होते. अठरा, वीस, बावीस तास काम करण्याच्या त्यांच्या सवयीनेच मोठेपणा, महात्मेपणा त्यांच्याकडे चालत आला. महात्मा गांधीजी पहाटे तीन वाजता उठून रात्री दोन वाजेपर्यंत काम करीत. आज उपलब्ध असलेली त्यांची हजारो पत्रं त्यांनी स्वतःच्या हाताने लिहिली होती. त्यांच्या भाषणांचे, लेखांचे इतके खंड उपलब्ध आहेत की, तितके त्यांच्या आधीचा किंवा नंतरचा फर्डा लेखकही जन्मभर उद्योग करून लिहू शकला नसता. शिवाय रोजचं चालणं, सत्याग्रह-कायदेभंगाची चळवळ, उपोषणं, कितीतरी कामं हा महात्मा करीत असे. त्यांचे अनुयायी पंडित नेहरूही तसेच. रात्री दोन-अडीच वाजेपर्यंत कार्यमग्न राहात. छत्रपती शाहूमहाराज तर पहाटे चार वाजता उठून रात्री अकरा-बारा वाजेपर्यंत कारभार पाहात असायचे. कर्मवीर भाऊराव पाटील आपल्या शाळांमधून दिवसभर तर फिरतच. पण रात्रीसुद्धा वसतिगृहातील मुलांची काळजी घेण्यासाठी, त्यांच्या अंगावरील पांघरुणं व्यवस्थित करण्यासाठी रात्रभर पहारा देत जागेराहात. एकूण जगातील सारे थोर पुरुष दिवसाचा सारा वेळ कामातच व्यतीत करीत, असं दिसतं. म्हणजेच थोर पुरुषांना त्यांच्यातील कार्यप्रवणतेने थोर बनवलं यात वाद नाही. एक विचारवंत म्हणतात, 'स्वकार्यरत राहिल्याने मनुष्य सर्वोच्च व पूर्ण अवस्थेस पाहोचतो.' पण या किंवा अशा विचारांचा परिणाम स्वभावतः कामचुकार असलेल्या भारतीय माणसावर होत नाही, असंच दिसतं.

आम्ही भारतीय माणसं आळशी का आहोत, त्याची तपासणी करताना लोकहितवादी देशमुख म्हणतात, 'बहुधा नियम असा आहे की, जे लोक शहाणे आहेत; ते उद्योगवादी असतात व मूर्ख आहेत; ते प्रारब्धवादी असतात. कारण उद्योगाने सिद्धी होते हे ते जाणत नाहीत.' बरं, शहाणं होण्यासाठी खूप शिकावं, असंही आम्हा भारतीयांना वाटत नाही. अक्षरओळख झाली, की आमचं शिकणं संपलं. लोकहितवादी त्याविषयीसुद्धा आम्हाला फटकारतात. ते लिहितात, 'लिहिणं आणि वाचणं हे विद्येचे द्वार असून खरी विद्या त्यापुढे आहे. परंतु लोकांच्या समजुती आखूड असल्याने ते अंधारात गर्क आहेत. '

पाश्चात्त्य विचारवंत गिबन कार्य कसं घडतं हे सांगतात, 'कोणत्याही कामाचा निर्णय आधी हृदय घेतं, मन योजना तयार करतं आणि हात ते काम साकार करतात.' म्हणजेच कामाचा निर्णय आणि योजना ह्या मानसिक क्रिया आहेत. पण योजना साकारण्याच्या कामाला हात तयार नसतील तर? मनोरथाचा कणा मोडून पडायला वेळ लागणार नाही. हे टाळण्यासाठी ध्यानात घ्या-

निष्क्रियता महा । खादाड राक्षसी
फस्त अनेकांशी । तिने केले ॥१
जन्मले नि मेले। नोंद एवढीच
निष्क्रियतेमुळेच । घ्यावी लागे ॥२
निष्क्रिय ऐद्यांनी। किती संसारांची
वाट लावण्याची। कृत्ये केली ॥३
करा काहीही ते । पण करा सदा
घ्यावे या औषधा। बरे होण्या ॥४
समाज नि राष्ट्र । क्रियाशक्तीमुळे
नित्य पुढे चाले । हेच खरे ॥५



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

# श्रमलेल्या बापासाठी, लेक नारळाचं पाणी; लढणाऱ्या लेकीसाठी, आई - बाप बुलंद कहाणी !

नजिकपिंपरी (ता.मोहोळ) येथील वाघमोडे कुटुंब ७-८ शे लोकवस्तीच्या गावातील एक. वडील ४ थी नापास, आईने आयुष्यभर शेताच्या बाहेर पाऊल सुध्दा टाकलेला नाही. त्यांना ४ मुली आणि १ मुलगा. घरापर्यंत चार चाकी गाडी सुद्धा जात नाही. उदरनिर्वाह ५ एकर कोरडवाहू जमीन आणि २-३ जर्सी गायीच्या दुधावर. दररोज शाळेला जायचं म्हणलं तरी सुध्दा प्रचंड अडचणी. फोटोमध्ये मागे दिसतेय तेच त्यांचे घर !

पण अशात सुध्दा आई - वडिलांनी मुलामुलींना लढायला शिकवलं. असं लढायला शिकवलं की त्याचा इतिहास व्हावा. आणि आज १ मुलगा गणेश हा पुणे पोलीस मध्ये भरती होऊन बहिणींचा खर्च करतोय, त्यात दुसरी मुलगी सोनाली पुणे ग्रामीण पोलीस मध्ये निवड झालीय. एक ज्योती कायद्याचे शिक्षण घेते तर एक स्वप्नाली स्पर्धा परीक्षा देतेय. सगळ्यांची जिद्द,संघर्ष आणि सातत्य जबरदस्त!

पोरी शिकवायचं अवघड झालंय, पोरगी म्हणजे काचेचं भांड, पोरीच्या शिक्षणाचं अवघड आहे, मी शिकलो असतो पण घरची परिस्थिती नव्हती .... या सगळ्या वाक्याला सणसणीत चपराक म्हणजे हे कुटुंब आणि या मुली. म्हणून आवर्जून मनोज तात्या, आकाश दादा, भालेराव साहेब यांच्यासमवेत घरी जाऊन आई - वडील यांचा आणि गणेश, सोनाली यांचा सत्कार केलाय. तुम्हा सगळ्यांचे खूप खूप अभिनंदन आणि शुभेच्छा. उरलेल्या दोघांच्या सत्काराला लवकरच जावे लागणार ही खात्री आहे!

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना सलाम. ही जिद्द तुम्ही जनमानसात आणि मुलामुलीमध्ये पेरली आहे!

- ॲड. श्रीरंग लाळे,
मोहोळ, मो. 9421909088

# शेतकरी आक्रोश मोर्चा शेकडो शेतकऱ्यासह रवी राठी सहभागी



**मुर्तीजापुर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसह शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत मूर्तिजापूर येथे आक्रोश दहीहंडी मोर्चा काढण्यात आला या मोर्चात रवि राठी शेकडो शेतकऱ्यांसह सहभागी झाले

मुर्तीजापुर बार्शीटाकळी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा सोयाबीनला भाव द्या, विमा कंपनीच्या प्रतिनिधी वर गुन्हे दाखल करा, पिक पाहण्याची अट रद्द करा अशा विविध मागण्यांसह शेतकरी संघर्ष समितीतर्फे सर्व पक्षाचे झेंडे बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या मागणीसाठी पुढे या आव्हानात मोचार्चे आयोजन करण्यात आले होते या मोचार्चे नेतृत्व शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत जुन्या कॉटन मार्केट इथून सुरू झाला या दहीहंडी मोर्चामध्ये आपल्या शेकडो समर्थकांसह शेतकऱ्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीर्चे प्रदेश संघटक सचिव रवी राठी यांनी सहभाग घेतला होता, शेतकरी शेतमजुरांसाठी लढणारे शेतकरी पुत्र रवी राठी यांच्या सहभागाने या संपूर्ण मोर्चाचे लक्ष वेधले होते मुतीर्जापुर बाशीर्टाकळी मतदारसंघात अनेक पक्षाचे नेते आहेत मात्र या मोचार्ला फक्त आणि फक्त राजकीय पक्षातून रवी राठी यांची उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधली होती रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत, समाजसेवक रवी राठी सह उपविभागीय अधिकारी मुतीर्जापुर यांना शेतकऱ्यांच्या समस्येबाबत निवेदन सादर करण्यात आले यावेळी शेतकरी नेते गजानन अहमदाबादकर, कृष्णा गावंडे, चंद्रशेखर गवळी, नितीन गावंडे सह हजारो शेतकरी उपस्थित होते.

# शालेय क्रिकेट स्पर्धेमध्ये शिवरत्न पॅटर्न मधील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिवरत्न शिक्षण संस्था शंकरनगर अकलूज, संचलित शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, शिवरत्न पॅटर्न, अकलूज मधील 19 वषार्खालील जिल्हास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेमध्ये मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक संपादन केला आहे.तर संघ विभागीय स्तरीय स्पधेर्साठीही पात्र ठरविण्यात आला आहे.



संपूर्ण संघाच्या या यशाबद्दल शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील, अध्यक्षा तथा शिवरत्न पॅटर्नचे चेअरमन सौ. शितलदेवी धैर्यशिल मोहिते-पाटील व सर्व संचालक मंडळ तसेच प्रशालेचे प्राचार्य, समन्वयक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून संघाचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## वात्रटिका

### आता काय करायचं

शाळा दत्तक देणे आहे
दत्तक योजना आता
पाय पसरु लागली...
शिक्षण क्षेत्रात सुद्धा
घुसखोरी करू लागली...
अंबानी अदानी अजून
कोणी कोणीही यावे...
सरकारी शाळेला तुम्ही
खुशाल घेऊन जावे...
सुधारणा आणि विकासाचा
हा नवीनच अध्याय आहे...
अंबानींच्या शाळेतील बघू
आता कसला स्वाध्याय आहे...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

# आर्या कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये जागतिक औषध निर्माता दिन उत्साहात साजरा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ निमगाव संचलित आर्या कॉलेज ऑफ फार्मसी टेंभुर्णी येथे 25 सप्टेंबर हा जागतिक औषध निमार्ता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात भव्य रॅलीने करण्यात आली. टेंभुर्णी शहरामधून रॅली काढण्यात आली व समाज प्रबोधन करण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समर्थ हॉस्पिटलच्या डॉक्टर अश्विनी ढवळे या उपस्थित होत्या. डॉक्टर अश्विनी ढवळे यांनी विद्यार्थ्यांना ॲडव्हअर्स ड्रग्स रिएक्शन रिपोर्टिंग तसेच आरोग्य व्यवस्थेमधील औषध निर्मात्याचे योगदान याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. जागतिक औषध निर्माता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, पथनाट्य व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमासाठी सुनंदा विद्यानिकेतन चे मुख्याध्यापक मारुती ढगे तसेच आर्या कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य धनंजय चव्हाण व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका प्रतीक्षा मुळे यांनी केले व आभार प्रदर्शन अमृता कसबे यांनी केले.

# उद्योगस्नेही धोरणामुळे परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर : उद्योगमंत्री उदय सामंत

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी घेतेलेले निर्णय, राबविण्यात आलेल्या योजना, उद्योजकांना उपलब्ध करुन दिलेल्या उच्च दर्जाच्या सुविधा, औद्योगिक वसाहतीत केलेली पायाभूत सुविधांची कामे यामुळे उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक आली असून उद्योगस्नेही धोरणामुळे महाराष्ट्र राज्य परकीय गुंतवणूकीत प्रथम क्रमांकावर आहे असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले.

'महाराष्ट्राची उद्योग भरारी' या उद्योग विभागाच्यावतीने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.शिवाजी पाटील, उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मुख्य अभियंता नितीन वानखेडे यावेळी उपस्थित होते.

मी स्वतः उद्योजक असून उद्योजकांच्या अडचणींची आणि त्यांच्या समस्येची मला चांगली जाणीव आहे असे सांगून उद्योगमंत्री श्री.सामंत म्हणाले, महाराष्ट्राची उद्योग भरारी हा कार्यक्रम उद्योग विभागातर्फे राबविण्यात आलेल्या योजनांची पारदर्शकता दाखविणारा आहे. उद्योगांसाठी शासन सकारात्मक आहे. महाराष्ट्रात सात ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. आतापर्यंत नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लहान आणि मोठया उद्योजकांचे महाराष्ट्रात स्वागतच आहे. उद्योग क्षेत्रात पुरुषांसोबतच महिलाही पुढाकार घेत आहे. राज्याच्या उद्योगस्नेही धोरणामुळे एकही उद्योग राज्याबाहेर गेला नाही. उद्योग विभागावर केलेल्या टिकेमुळे महाराष्ट्राचे नुकसान होते हे टिका करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे असे त्यांनी सांगितले केले.

औद्योगिक क्षेत्रात जवळपास पंच्याहत्तर हजार कोटी रुपयांची गुतवणूक आली असून परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. सुमारे अडीच हजार कोटी रुपये खर्चून राज्यातील २८९ औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सोईसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. बीडकीन औद्योगिक क्षेत्रात ५२ हजार कोटी रुपयांची, एक लाख कोटी रुपयांची विदर्भात तसेच कोकण औद्योगिक क्षेत्रात १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेद्वारे महिलांना शासनातर्फे आर्थिक मदत करण्यात येते. ही रक्कम बाजारात येण्यामुळे त्याचा उद्योग क्षेत्राला फायदा होणार असल्याचे श्री.सामंत यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत १० नवीन उद्योजकांना उद्योगमंतत्र्यांच्याहस्ते पाच कोटी रुपयांच्या अनुदानाचे वितरण करण्यात आले.

खासदार श्री.बारणे म्हणाले, उद्योजकांचा उद्योग विभागातर्फे सत्कार करणे चांगली संकल्पना आहे. पुणे व परिसरातील उद्योजक व कामगारांच्या समस्या सोडविण्याला शासनाने प्राधान्य दिले असून, रिंग रोड व मेट्रोच्या जाळ्यामुळे वाहतूक समस्या सुटण्यास मदत झाली आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सहकार शिरोमणी कारखाना इतर कारखान्याच्या बरोबरीने ऊस दर देणार - कल्याणराव काळे



भाळवणी (कटूसत्य वृत्त):- सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याने ऊस दराच्या स्पर्धेत उतरुन आत्तापर्यत एफआरपी पेक्षा जादा व इतर कारखान्याच्या बरोबरीने ऊस दर दिला आहे. येणाऱ्या गळीत हंगामात ही परंपरा कायम ठेवण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असेल. त्यासाठी ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद शेतकऱ्यांनी नेहमीप्रमाणे भक्कम साथ संचालक मंडळाला द्यावी, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांनी कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना केले. दरम्यान, कारखान्याची 33 वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. वार्षिक सभेतील सर्व विषयांस उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात व एकमताने मंजूरी दिली. कारखान्याची अधिमंडळाची 33 वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखाना कार्यस्थळावर उत्साहात पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. कारखान्याचे व्हा.चेअरमन भारत कोळेकर, माजी व्हा.चेअरमन मारुती भोसले, राजेंद्र शिंदे व संचालक मंडळाची प्रमुख उपस्थिती होती. गळीत हंगाम 2023-24 चा आढावा घेताना कल्याणराव काळे पुढे म्हणाले, गेल्या गळीत हंगामात ॲडव्हान्स देवुनही निम्यापेक्षा जास्त तोडणी वाहतुक यंत्रणा आली नाही. त्याचा परिणाम सुरुवातीच्या दैनंदिन गाळपावर झाला. राज्य शासनाच्या हमीवर एमएससी बँकेकडून पहिल्या टप्यातील कर्ज प्रत्यक्षात हंगाम सुरु झालेनंतर कारखान्याच्या खात्यावर जमा न होता संबंधितांच्या बँक खात्यावर जमा झाले. जवळपास आठ्यान्व कोटी रुपये एमएससी बँकेने कर्जात भरुन घेतले. गेल्या हंगामात दैनंदिन गाळप क्षमतेएवढा ऊस उपलब्ध होण्यासाठी कमी पडणारी ऊस वाहतुक यंत्रणा उभी करण्यासाठी सर्व सहकारी संचालक, कार्येकर्ते यांनी परिश्रम घेतल्यामुळेच गेल्या हंगामात 2 लाख 37 हजार टन ऊस गाळप आपण करु शकलो.

येणारा 2024-25 गळीत हंगामाबाबत बोलताना कल्याणराव काळे पुढे म्हणाले, या हंगामात दैनंदिन तीन ते साडेतीन हजार टन ऊस गाळप होण्याच्या दृष्टीने ट्रक, ट्रॅक्टर, बजॅट, बैलगाडी यांना पहिला हप्ता दिलेला असून, दुसऱ्याचे नियोजन सुरु आहे. कारखान्यातील देखभाल, दुरुस्तीची कामेही अंतिम टप्यात आहेत. या हंगामात साडेचार लाख टन ऊस गळीताचे उद्दिष्ट व्यवस्थापनाने ठेवलेले आहे. ऊस तोडणी मजुर, मुकादम, वाहन मालकास संचालक मंडळाने नेहमीच सहकार्य केले आहे. ज्या वाहन मालकांच्या टोळ्या पळून गेल्या त्यांचा ॲडव्हान्स वसुल करताना बऱ्याच वाहन मालकांचे व्याज वसुल केलेले नाही, अडवणुक केलेली नाही. ग्रामिण भागातील ऊस उत्पादक शेतकरी व या उद्योगावर अवलंबुन असणाऱ्या अनेक कुटुंबांचे आर्थिक सक्षमिकरण या साखर उद्योगावर अवलंबुन आहे. त्यामुळे या उद्योगाला आर्थिक स्थैर्य येण्यासाठी केंद्र शासनाने एफआरपीच्या तुलनेत साखर, आरएस, इथेनॉल, इएनए यांची एमएसपीही वाढविण्याची गरज असून, तशी मागणी महाराष्ट्र व केंद्र शासनाकडे केली आहे

स्व.वसंतराव दादांनी या परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, इथल्या शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी या साखर कारखान्याची उभारणी केली. त्यांच्या आचार विचारांचा वारसा जपत गेली 24 वर्षे हा कारखाना तुम्हा सभासद शेतकरी, ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, कार्येकर्ते, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नातुन वाटचाल करतोय. साखर उद्योगाला को-जनरेशन, डिस्टीलरी अशा पूरक उद्योगांची जोड देत सहकाराला सामाजिक, अध्यात्मिक, वैद्यकीय, आर्थिक, शैक्षणिक, क्रिडा अशा विविध क्षेत्रांची जोड देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. हंगाम 2024-25 मध्येही कार्यक्षेत्रासह परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्यास आपला संपूर्ण ऊस गळीतासाठी पाठवुन हा हंगाम यशस्वी करावा, असे आवाहनही शेवटी कल्याणराव काळे यांनी केले.

प्रारंभी कारखान्याचे संस्थापक स्व. वसंतरावदादा काळे आणि विठुमाऊली यांच्या प्रतिमेचे पुजन पिराची कुरोलीचे माजी सरपंच तुकाराम मरुती माने व सरकोलीचे माजी उपसरपंच तात्यासाहेब दत्तु भोसले यांचेहस्ते करण्यात आले. वार्षिक सभेच्या नोटीसचे वाचन कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक पोपटराव ज्ञानेश्वर घोगरे यांनी करुन सर्व विषयांना मंजुरी घेतली. वार्षिक सभेच्या अध्यक्षपदासाठी कल्याणराव काळे यांचे नांव संचालक दिनकर कदम यांनी सुचविले, त्यास माजी व्हा.चेअरमन व संचालक राजेंद्र शिंदे यांनी अनुमोदन दिले. श्रध्दांजलीचा ठराव पंचायत समितीचे माजी सदस्य सुरेश देठे यांनी मांडला. उपस्थितांचे स्वागत संचालक युवराज दगडे यांनी केले. आभार संचालक मोहन नागटिळक यांनी मानले. सुत्र संचालन रावसाहेब पवार यांनी केले.

सभेस कारखान्याचे व्हा.चेअरमन भारत कोळेकर सर्व श्री संचालक राजेंद्र शिंदे, मोहन नागटिळक, गोरख जाधव, आण्णा शिंदे, राजाराम पाटील, दिनकर कदम, तानाजी सरदार, योगेश ताड, युवराज दगडे, नागेश फाटे, परमेश्वर लामकाने, संतोष भोसले, जयसिंह देशमुख, सुनिल सराटे, अमोल माने, अरुण नलवडे, संचालिका उषाताई माने, संगिता देठे, माजी व्हा.चेअरमन मारुती भोसले, मा.संचालक पांडुरंग कौलगे, प्रताप म्हेत्रे, विलास जगदाळे, इब्राहिम मुजावर, भारत गाजरे, तात्या गंगथडे, राजाभाऊ माने, संभाजी बागल, अरुण बागल, विठ्ठल कारखान्याचे माजी संचालक महादेव देठे, उत्तम नाईकनवरे, यशवंत सहकारी पतसंस्थेचे चेअरमन शहाजी साळुंखे, प्रतिभादेवी नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन विष्णु यलमार, भाळवणी ग्रामपंचायतीचे सरपंच रणजीत जाधव, दाऊद शेख, कारखान्याचे सभासद, शेतकरी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण नागरी सह. पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

## सभासदांना १० टक्के लाभांष - चेअरमन शहाजीबापू साळुंखे

पंढरपुर (कटूसत्य वृत्त):- यशवंतराव चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित गुरसाळे, या पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण पंढरपुर येथील संस्थेच्या सभागृहात खेळीमेळीत संपत्र झाली यावेळी पंढरपुरचे आराध्य दैवत श्री. पांडुरंगाचे प्रतिमेचे, संस्थेचे संस्थापक मा. कै. औदुबररावजी पाटील, (आण्णा), महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार मा. कै. यशवंतराव चव्हाण, सहकार शिरोमणी मा. कै वसंतराव काळे, कै. नारायण मोरे (दादा) यांचे फोटोपुजन करुन संस्थेचे जेष्ठ सभासद, मार्गदर्शक तथा सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, विठठल परिवाराचे नेते युवराज पाटील, यांचे शुभहस्ते दिपप्रज्वलन करुन सभेचे कामकाजास सुरवात झाली. यावेळी उपस्थित सभासदांचे स्वागत संचालक शंकर कवडे यांनी केले तर संस्थेचे संचालक बापुसाहेब दांडगे यांनी चालु सालात दिवंगत झालेले संचालक कै. ज्ञानोबा शामराव घाडगे यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहीली.

संस्थेचे चेअरमन शहाजीबापू साळुंखे आपले मनोगत वाचन करताना, सभासद ठेवीदार याचे विशेष आभार मानून संस्थेच्या प्रगतीचा आलेख वाचन केला. आज संस्थेची वाटचाल आपले सर्वांच्या सहकार्याने 70 कोटीकडे झाली आहे. वार्षिक उलाढाल ही सभासदांनी लावलेला हातभार व संस्थेचा वाढलेला प्रगतीचा आलेख पाहता त्यानी दाखविलेला




विश्वासास पात्र राहून आज संस्था 70 कोटीकडे वाटचाल करीत आहे. चालु वर्षी संस्थेस ४९.१९ लाख नफा झाला आहे. असे सांगून सभासदांना दरवर्षी प्रमाणे दिवाळी सणाकरीता 10 % लाभांष सक्तीचे ठेवीच्या व्याजावर खातेदाराचे बचत खातेवरुन देण्यात येणार असल्याचे सांगितले. संस्थेचे सभासद कर्जदार यांना आव्हाण करताना सुचना केली की आपण संस्थेकडुन घेतलेली कर्जे थकीत न घालवता वेळेत भरुन संस्थेची जास्तीत जास्त कर्जवसुली होणेसाठी सहकार्य करावे, तरच संस्थेचा प्रगतीचा जास्तीत जास्त आलेख उंचावेल, व वसुलीकरीता कायदेशिर कार्यवाही करणे वाचेल असे साळुंखे यांनी सांगीतले.

यावेळी संस्थेचे मार्गदर्शक कल्याणराव काळे म्हणाले की, आज संस्थेची वाटचाल आपल्या सर्वांच्या सहकार्याने 70 कोटीकडे झालेली आहे. हीच सभासदांनी दिलेली चांगल्या कामाची पाहोच पावती असल्याचे सांगीतले. अशीच पुढे वाटचाल रहावी असे संचालकांना सांगून सर्व संचालकांचे आभार मानले.

सदर सभेस सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन भारत कोळेकर, संचालक मोहन नागटीळक सुरेश देठे, दिनकर कदम, राजु माने, योगेश ताड, अरुण नलवडे,परमेश्वर लामकाने, आण्णामामा शिंदे, संतोष भोसले, यशवंतराव चव्हाण पतसंस्थेचे संचालक रणजीत पाटील, विलास जगदाळे, महादेव शिखरे, सुभाष कुंभार, रमेश पाटील, मल्हारी गलांडे, सभासद तात्यासो निकम, अनिल नागटिळक, दिनकर चव्हाण, महादेव देठे,नारायण शिंदे, रामचंद्र मोरे, सुदाम मोरे,अर्जुन जाधव, शंकर महाराज चव्हाण, रामचंद्र कौलगे, नारायण गायकवाड, शरद पवार, राजाराम गायकवाड, आण्णा रोडगे, ज्ञानोबा झांबरे आण्णा झांबरे, तुकाराम माने, इब्राहिम मुजावर, ज्योतीराम पोरे, अनंता घालमे, लक्ष्मण साळूंखे, बाबा करपे, पोपट घालमे, सत्यवान साळूंखे, कल्याण साळूंखे, कैलास शिर्के, युवराज साळूंखे, नवनाथ पवार, शहाजी पवार, प्रतिभादेवी नागरी सहकारी पतसंस्थचे सर्वसंचालक, कर्मचारी, संस्थेचे सर्वसंचालक, सभासद मोठया संख्येनी उपस्थित होते. संस्थेचे मॅनेजर सुनिल देसाई यांनी सभेचे नोटीस वाचन केले त्यास सभेने हातउंचावुन आवाजी मताने मंजुर असे संबोधुन मंजुरी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालक कर्मचारी संजय जगताप केले तर उपस्थितांचे आभार संचालक व्हा.चेअरमन पांडूरंग मोरे यांनी मानले

# माजी आमदार राजन पाटील यांचा राष्ट्रवादीच्या वतीने विशेष सत्कार



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य नाव विकासाभिमुख नेतृत्व माजी आमदार राजन "मालक"पाटील यांची राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेच्या अध्यक्षपदी निवड केली.आणि खऱ्या अथार्ने निष्ठावंत कार्यकर्त्याला दादांनी न्याय दिला.

त्यांच्या या निवड प्रक्रियेबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पाटीर्चे सोलापूर शहर. जिल्हाध्यक्ष संतोष पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य किसन जाधव, कार्याध्यक्ष जुबेर बागवान जेष्ठ नेते हेमंत चौधरी, व्ही., व्ही. पी.कॉलेज चे अमोल त्रनाना त्र चव्हाण, जिल्हा दूध संघ चेअरमन दीपक माळी, अनिल कादे गुरुजी माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, युवक प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश त्र आण्णात्रगायकवाड, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष वैभव गंगणे यांनी माजी आमदार नुतन राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष राजन "मालक" पाटील यांना "मोहोळचे मालक" हा भरजरी फेटा बांधून शाल पांघरून भव्य पुष्पहार घालून भव्य - दिव्य सत्कार केला. या निवड प्रक्रियेबद्दल जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, प्रदेश उपाध्यक्ष किसन भाऊ जाधव,कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, जेष्ठ नेते हेमंत चौधरी,माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे यांनी माजी आमदार राजन पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी माणिक कांबळे, वसंत कांबळे, महादेव राठोड यांची उपस्थिती होती.

# सोलापूरचे डॉ.अंबारे यांच्या संशोधनाचे ऑस्ट्रेलियामध्ये सादरीकरण



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने भारतामध्ये इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत चालली आहे. वाहनांमध्ये बॅटरी सोबत सुपरकॅपॅसिटर जोडल्यास विजेची बचत होऊन बॅटरीचे आयुष्य देखील वाढते. ही संकल्पना पर्यावरण पूरक असून त्यामुळे खर्चामध्ये बचत होणार आहे. भारतामध्ये ऊर्जा साठवणूक ही काळाची गरज ओळखून अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी गावचे सुपुत्र डॉ. रेवणप्पा चंद्रकांत अंबारे हे सुपर कॅपॅसिटर या संकल्पनेवरती संशोधन करीत आहेत.

क्वीनसल्यांड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विशेषज्ञ (रिसोर्स पर्सन) म्हणून व्याख्यान देण्यासाठी डॉ. अंबारे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. "प्रगत साहित्य संश्लेषण वैशिष्ट्यीकरण आणि अनुप्रयोग" हा विषय असलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक देशातील नामवंत संशोधकांनी सहभाग घेतला आहे. ऊर्जा साठवणूक आणि सुपरकपॅसिटर या विषयावरील सखोल संशोधनामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत सहभाग होण्याचा संधी मिळाली आहे. टू व्हीलरमध्येही अल्ट्रा कपॅसिटरचा वापर करणे शक्य असून त्यामुळे बॅटरीचे अल्प आयुष्य, बॅटरी बदलण्यासाठी येणारा खर्च आणि बॅटरीमुळे होणारे प्रदूषण टाळता येणे शक्य आहे. कपॅसिटरला कमी देखभाल लागते. तसेच कितीही थंडी असली तरी वाहन बटन स्टार्ट करता येणे शक्य होते. त्या अनुषंगाने भविष्यातील गरज लक्षात घेऊन भारतात येत्या दहा वर्षात प्रत्यक्ष सुपर कपॅसिटरचे उत्पादन सुरू होणे आवश्यक असल्याचे मत डॉ. अंबारे यांनी व्यक्त केले.

गेल्या १४ वर्षयापासून ते सुपरकॅपॅसिटर या संकल्पनेवरती संश डॉ. अंबारे हे काम करत आहेत.सद्या के. एम. सी. कॉलेज, खोपोली येथे सहायक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत सहभाग घेतलेल्या डॉ. रेवणप्पा अंबारे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.२०२४/कुका (जन्म नोंद) एसआर/१५८/२०२४

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात

सोनाली सुरेश शिंदे — अर्जदार
रा. कुर्डुवाडी ता. माढा जि. सोलापूर

विरुध्द

मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी — सामनेवाला
ता. माढा जि. सोलापूर

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे स्वतः सोनाली सुरेश शिंदे यांचा जन्म दिनांक २५/०४/१९९२ रोजी कुडुर्वाडी ता. माढा येथे झालेला आहे. परंतु त्याचा जन्माची नोंद पुवीर्चे ग्रामपंचायत/न.पा. कुडुर्वाडी येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा कुडुर्वाडी येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे स्वतः सोनाली सुरेश शिंदे यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख ०८/११/२०२४ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/ तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक २५/०४/१९९२ रोजीचे जन्म नोंद धरून तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल. तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी. ही नोटीस आज दिनांक २७/०९/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

शिक्का

तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा


# Classified - छोटी जाहीरात

### यात्रा

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर
अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर,
श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर,
काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

### विकणे आहे

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्कः 9881361260**

### पाहिजेत

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्कः गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

### पाहिजेत

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्कः 9591409911 / 9272021110

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### बांधकाम

घर बांधा, सोलापूर महानगर पालिका नियमाप्रमाणे. बांधकाम परवानगी मिळेल. संपर्कः
**चेतन अलकुंटे**
**९५६१४३३३७७**

### लोन

**संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रकारचे लोन मिळतील**
**संपर्कः 8689934996**








**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०३



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

### शब्दकोडे क्र. १०२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | य | ग | ड | | को | ल्हा | पू | र | | गो | वा |
| ज | | ड | र | का | ळी | | ल | ग | ब | ग | |
| ना | य | क | | न | | मे | | ड | ब | ल | |
| थ | | री | म | | ॐ | | गां | | न | गा | रा |
| सिं | | | न | ल | | बे | गु | स | रा | य | |
| ह | क | ना | क | | न | क | ली | | व | | न |
| | मी | | व | | वा | री | | शी | | प | थ |
| रा | ज | वा | डा | | ज | | सो | ला | पू | र | |
| ज | | च | | वे | श | | ळा | | | म | का |
| स्था | | ना | क | | री | त | | ए | क | वी | स |
| न | व | ल | | न | फ | र | त | | स | र | |
| | सा | य | र | न | | | ग | री | ब | | फ्री |

# शेतकरी विरोधी महायुती सरकारच्या विरोधात महाविकास आघाडीचा 'संग्राम मोर्चा'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शेतकरी आणि सर्वसामान्य जनता विरोधी महायुती सरकारच्या विरोधात, माहाविकास आघाडीच्या वतीने "संग्राम मोर्चा" मोर्चा आयोजित केला असून आज रोजी शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे खासदार प्रणितीताई शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर महाविकास आघाडीच्या वतीने खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या दडपशाही, भ्रष्टाचारी आणि शेतकरी विरोधी सरकार विरोधात मंगळवार दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता भव्य असा संग्राम मोर्चा काढण्यात येणार आहे.

मंगळवार दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता चार हुतात्मा पुतळा या ठिकाणापासून मोचार्चे आयोजन करण्यात आले असून सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे या मोच्यार्चे नेतृत्व करणार आहेत.

केंद्रातील भाजपा सरकार आणि राज्यातील महायुती सरकारने सत्तेत येण्यापुर्वी शेतकऱ्यांना विविध आश्वासणे दिली होती. मात्र त्या अश्वसनाची पूर्तता करण्यापासून सरकार अंग काढू भूमिका घेताना दिसून येत आहे. त्यातच वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनता आणि शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला. अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच मागील नुकसान भरपाई अद्यापही शेतकऱ्यांना मिळाली नाही. त्यामुळे अस्मानी संकटात सापडलेला शेतकरी आता या जुलमी सरकारच्या निष्क्रियतेमुळे मेटकुटीला आला आहे.



या व इतर प्रश्नावर हा मोर्चा काढण्यात येणार असून सोलापूर शहर जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी, नागरिक बंधु भगिनी, महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभाही व्हावे असे आवाहन खासदार प्रणितीताई शिंदे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष अँड नंदकुमार पवार, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते भारत जाधव, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे अध्यक्ष अजय दासरी, अमर पाटील, प्रदेश सरचिटणीस संजय हेमगड्डी, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, दादा साठे, अशोक देवकते, मनोज यलगुलवार, संदीप पाटील, भारत जाधव, राजेश पवार, देवाभाऊ गायकवाड, तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते.

### सोलापूर जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबीत आहेत

1) शेती मालाला हमीभाव मिळत नाही.
2) सरसकट सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी कधी होणार ?
3) अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाचे पंचनामे केले परंतु नुकसानीची भरपाई मिळाली नाही याचा जाहीर निषेध.
4) शेतकऱ्यांच्या पाणी पट्टीत केलेल्या 10 पट वाढीचा निषेध.
5) शेतीसाठी 24 तास वीज पुरवठा दया.
6) शेती अवजारे, खत व औषधे यावरील GST रद्द करा.
7) 7.5 HP विज बिल माफ केले. 8 / 9 HP पुढील विज बील माफ कधी होणार ?
8) PM किसानची रक्कम सरसकट सर्व शेतकऱ्यांना मिळत नाही.
9) शेतीसाठी कॅनल मधून पाण्याचे योग्य नियोजन केले जात नाही.
10) सोयाबीन, तूर, कांदा, उडीद व फलबाग यांचा पिक विमा विमा कंपनीच्या मनमानी कारभारामुळे मिळत नाही.
11) ज्या त्या भागात जे पिक घेतलं जातं त्याचा समावेश पिक विम्यात करण्यात यावा.
12) प्रधानमंत्री घरकुल योजनेसाठी गायरान जागा गावठाण करावी किंवा गायरान जोवर घरकुल बांधण्याची परवानगी दयावी.
13) ओला दुष्काळ जाहीर करा.
14) प्रत्येक गावात ग्रामसेवक / कोतवाल यांची नियुक्ती करावी.
15) गावास स्वतंत्र महावितरण वायरमन उपलब्ध करून दयावा.
16) गावाला व शेतकऱ्यांना मागणीनुसार MSEB DP देण्यात यावा.
17) नदीला पाणी सोडल्यानंतर वीज पुरवठा पूणवेळ दयावा.
18) जल–जीवन योजनेचा अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करण्यात यावा.
19) दुधाला 40 रु दर मिळावा व दूध अनुदान शेतक–याच्या थेट खात्यामध्ये देण्यात यावे.
20) सर्व प्रकारच्या रेशनकार्ड धारकांना धान्य मिळावे.
21) गाव दत्तक घेतलेल्या बँका शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करत नाही.
22) शेतक–यांच्या वर्ग 2 जमीनी वर्ग 1 करण्यात यावेत.
23) सर्व रस्ते plan मध्ये घ्यावे. Plan - Non Plan असा भेदभाव नको.
24) DCC बँकेने शेतकऱ्यांना पूर्वप्रमाणे कर्ज पुरवठा करावा.
25) मंगळवेढा तालुका २४ गाव उपसा सिंचन योजना त्वरीत कार्यान्वित करावी.
26) मराठा, धनगर, मुस्लिम, कोळी समाजास आरक्षण दयावे.

# प्रताप क्रीडा मंडळाची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** प्रताप क्रिडा मंडळ हे गेली ४६ वर्ष सामाजिक बांधिलकी जपत अविरतपणे कार्य करणारी संस्था असून या क्रिडा मंडळाची स्थापना सन १९७६ झाली आहे ग्रामीण भागात कला,क्रिडा, सामाजिक,सांस्कृतिक,आरोग्य इत्यादी अनेक क्षेत्रात विविध उपक्रम व क्रिडा स्पर्धा राबविण्यात अग्रेसर आहे.या प्रताप क्रिडा मंडळामुळे आज अनेक मुलांना कला,क्रिडा क्षेत्रात व्यासपीठ उपलब्ध झाले असून त्यामुळे अनेकांचे भवितव्य घडलेले आहे असे उदगार मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी काढले.

प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर–अकलूजची सन ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा स.म.शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या उदय सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.या




सभेची सुरुवात सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील व स्व.श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन जेष्ठ संचालक वसंत जाधव यांच्या शुभहस्ते व अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते–पाटील,स.म साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले,उपाध्यक्ष पोपट भोसले–पाटील या मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न झाले.

या सभेचे इतिवृत्ताचे वाचन मंडळाचे सचिव बिभीषण जाधव सर यांनी केले.अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या सभेत सहा विषयांचे वाचन करण्यात आले त्यास सर्व सभासदांनी सवार्नुमते मंजुरी दिली.

अध्यक्षीय मनोगतामध्ये मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते–पाटील यांनी मंडळाच्या वतीने स्व.श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांची जन्मशताब्दी,मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते–पाटील आणि अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते–पाटील यांचे अमृतमहोत्सवी वाढदिवसा निमित्त वार्षिक स्पर्धा व उपक्रम राबविले जात असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले.सहकार महर्षीनी स्थापन केलेल्या संस्था सांभाळणे ही फार मोठी जबाबदारी असून संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वाच्या सहकायार्ने सर्व उपक्रम,स्पर्धा यशस्वीपणे पार पडत आहेत. सामाजिक बांधिलकीचा उद्देश समोर ठेवून गेल्या ४६ वषार्पासून मंडळ अविरतपणे कार्य करत आहे.सर्व सभासदांनी आपले मानसिक आरोग्य जपत शारीरिक आरोग्याकडे लक्ष देण्याचा सल्ला त्यांनी दिला.

या सभेस मंडळाचे सर्व पदाधिकारी,संचालक मंडळ, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेचे सूत्रसंचालन राजकुमार पाटील यांनी केले. मंडळाचे संचालक बाळासाहेब सावंत यांनी आभार मानले.या सभेची सांगता 'सारे जहाँ से अच्छा' या देशभक्तीपर गीताने झाली.

# प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक तयार झाले पाहिजेत - नरेंद्र पाटील

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):–** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ घेऊन राज्यात एक लाख तर सोलापूर जिल्ह्यात 10 हजार उद्योजक तयार झाले. महामंडळाच्या व्याज परतावा योजनेमुळे नव्या उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. पंढरपूर येथे नव्याने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपकेंद्र सुरु करण्यात आले असून, महामंडळाच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक तयार झाला पाहिजे असे प्रतिपादन अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात 1 लाख मराठा उद्योजक संख्या पूर्ण झाली. त्यानिमित अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, लोकमंगल बँक, पंढरपूर अर्बन बँक, निशिगंधा बँक व अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने मराठा उद्योजक जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा श्रीयश पॅलेस, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला होता.



या मेळाव्यास आमदार समाधान आवताडे, लोकमंगल बँक, पंढरपूर अर्बन बँक, निशिगंधा बँक अधिकारी पदाधिकारी, अखिल भारतीय मराठा महासंघाचे पदाधिकारी तसेच मराठा उद्योजक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नरेंद्र पाटील म्हणाले, जिल्ह्यात राष्ट्रीयकृत व सहकारी बँकेने महामंडळाच्या योजनेच्या लाभार्थ्यांना सहकार्य केले त्यामुळे जिल्ह्यात अनेक मराठा उद्योजक महामंडळाच्या माध्यमातून उभे राहिले आहेत. ग्रामीण भागातील मराठा तरुणांनी महामंडळाच्या योजनेचा लाभ घेऊन गावातच उद्योग व्यवसाय सुरू करावा. त्यातून आपली व समाजाची आर्थिक उन्नती करावी. तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हे व तालुक्यांचा दौरा करुन महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी युवकांना उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शन करुन मराठा समाजातील तरुण–तरुणींना उद्योजकांच्या प्रवाहात सामील केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच शासनाकडून मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. सारथीमार्फत देण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करीत आहेत पंढरपूर येथे सुरु करण्यात महामंडळाच्या उपकेंद्राचा सांगोला, मंगळवेढा, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार असून, जास्तीत–जास्त मराठा समाजातील तरुणांनी याचा लाभा घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत व सहकारी बँकानी योजनेच्या लाभार्थ्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, जिल्ह्यामध्ये महामंडळाच्या माध्यमातून सुमारे 25 हजार लाभार्थी म्हणजे 25 हजार उद्योजक होण्याची संधी दिली. पंढरपूर येथील अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या उपकेंद्राच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्यातील तसेच परिसरातील मराठी तरुणांना लाभ होणार आहे. जास्तीत–जास्त मराठी तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच या योजनेचा लाभ घेतल्यास त्याचा परतावाही वेळेत करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी यशस्वी उद्योजक व लाभार्थी रोहित पवार यांनी आपले अनुभव कथन केले. तसेच अर्जुन पवार, प्रणव परिचारक यांनी मेळाव्यात आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी योजनेचे लाभार्थी तसेच राष्ट्रीयकृत व सहकारी बँकेच्या अधिकारी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

**पंढरपुरातील महामंडळाच्या उपकेंद्राचे उदघाटन**

पंढरपूर येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या उपकेंद्राचे उद्घाटन अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. या महामंडळाच्या उपकेंद्राचा सांगोला, मंगळवेढा, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील नारिकांना होणार आहे.

# सूक्ष्मजीवशास्त्र विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये गृहविज्ञान महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचे यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाच्या एकूण सात विद्यार्थिनींनी गुवाहाटी विद्यापीठ, गुवाहाटी, रंगपारा कॉलेज, गुवाहाटी व ग्लोबल इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 17/09/2024 रोजी आयोजित केलेल्या सूक्ष्मजीवशास्त्र विषयावरील



आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी होऊन शोध निबंधाचे सादरीकरण केले. यापैकी तीन विद्यार्थिनींना परिषदेमध्ये उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरणासाठी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक कु. अमृता बाळासो मगर, द्वितीय क्रमांक कु. सोनाली विलास सावंत व तृतीय क्रमांक कु. वैष्णवी जोतीराम माने यांनी पटकाविला. विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी कौतुक केले. विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. अमित घाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# राष्ट्रवादी युवक युवती च्या वतीने सोलापुरात सहा कॉलेज मध्ये युवक युवती संवाद कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** "होय आम्ही सक्षम, आपलं शासन भक्कम " युवती, युवक संवाद हा कार्यक्रम सोलापूर शहरात राष्ट्रवादी युवती व राष्ट्रवादी युवक च्या वतीने घेण्यात आले. राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्ष संध्या ताई सोनवणे यांनी सोलापूर शहर दौऱ्यावर आले असता त्यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आले.

सोलापूरच्या सहा कॉलेज मध्ये युवक, युवती संवाद कार्यक्रम घेण्यात आले. युगंधर होमिओपॅथी कॉलेज, संगमेश्वर कॉलेज, छत्रपती शिवाजी सायं वाणिज्य कॉलेज, दयानंद कॉलेज, धनराज गिरजी नर्सिंग कॉलेज, सिव्हिल नर्सिंग कॉलेज येथे प्रदेशाध्यक्ष संध्या ताई सोनवणे यांनी नारीशक्तीचा जागर केला आणि त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महिला अत्याचार, महिला सबलीकरण व सक्षमीकरण, महिला संरक्षण या विषयांवर त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच महाराष्ट्र महायुती शासनाचे योजना मुलींना मोफत शिक्षण ,लाडकी



बहिण योजना, तसेच इतर योजना संदर्भात बोलले. शिक्षणाच्या योजना बारटी, सारथी, मारटी हे युवती युवकांपर्यंत पोहोचवून त्यांचा लाभ घ्यावा असे संध्या ताई सोनवणे म्हणाल्या. युवती संवाद दरम्यान विद्यार्थिनींच्या काही समस्या जाणून घेतल्या आणि विद्यार्थिनींच्या सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रम झाल्यानंतर संध्या ताई सोनवणे यांनी सोलापूरच्या ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर आणि अक्कलकोट स्वामी समर्थ मंदिर दर्शन घेतले.

कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष सुहास कदम यांनी केले. राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, माझी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर, कार्याध्यक्ष चित्रा कदम, महिला समन्वय शशिकला कस्पटे, प्रदेश सरचिटणीस लता ढेरे, युवती कार्याध्यक्ष पल्लवी पाटील, अपूर्वा कुंभार,सुरेखा गाडगे, रुक्मिणी जाधव, युवक संघटक दत्ता भडगंची, वैभव गंगणे, जुबेर फुलारी,सुरज गुप्ता, सत्यम जाधव या सर्वांनी सोलापूर मध्ये प्रदेशाध्यक्ष संध्या ताई सोनवणे येताच त्यांचे स्वागत आणि सत्कार केले आणि या सर्वांची उपस्थिती होती.

# विडी कामगारांच्या रोजगाराला नख लावू देणार नाही - कॉ. आडम मास्तर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** केंद्र सरकारने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून सर्व तंबाखू उत्पादनांचा समावेश असलेले सर्वसमावेशक कर धोरण प्रस्ताव तयार करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली तज्ञांची समिती गठीत केली आहे. उपलब्ध माहितीनुसार नऊ सदस्यीय समितीचे नेतृत्व आरोग्य मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव विकास शील हे करत आहेत आणि त्यात वस्तू आणि सेवा कर परिषद (GST), निती आयोग, केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ (CBIC), महसूल विभागाचे कर संशोधन यांचा समावेश आहे. युनिट, डब्ल्यूएचओ कंट्री ऑफिस फॉर इंडिया, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी (एनआयपीएफपी) या संस्था आहेत. तंबाखू उद्योग आणि कामगार संघटनांच्या कोणत्याही प्रतिनिधीशिवाय नऊ सदस्यांची समिती स्थापना करण्यात आली.

या उद्योगावर २८ टक्के जीएसटी लागू करण्यात आली आहे. यापूर्वी कारखानदार दर



हजार विड्यांमागे १६ रुपये भरत होते. सध्या दर हजारी विड्यास १.०५ रुपये अबकारी कर लागू आहे. त्यामुळे विड्यांचे दर सिगारेटच्या किंमतीच्या जवळपास होऊ लागले असून विड्या मुख्यतः गरीब लोक पितात. जर अशा कारणांमुळे विडी उद्योगाला फटका बसला तर धुम्रपान बंद होणार नसून (जो शासनाचा उद्देश आहे) तो सिगारेटकडे ओढला जाईल. सिगारेटचे उत्पादनात यांत्रिकीकरण असून तेथे खूप कमी कामगार लागतात. परिणाम विडी उद्योगातील रोजगार संपुष्टात येईल आणि लाखो गरीब कामगारांवर त्याचे परिणाम होतील.

त्या वस्तूवर उपकराचा बोजा लादून वाढलेला दर भरणे न परवडणारे आहे. तसेच सरकार विडी कट्याच्या वेष्ठनावर आरोग्याच्या धोक्याची सूचना १०० टक्के दर्शवणारे असावे असे सक्तीचे निर्देश दिले आहेत. यामुळे बिडी उद्योगाचे नाव व उत्पादकांची अन्य माहिती छापण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. या प्रमुख अडचणीमुळे बाजारात बनावट विडी उत्पादन येऊ शकेल. काळाबाजार होऊन सध्या बाजारात चालणाऱ्या विडी उत्पादकांच्या उत्पादनांवर दूरगामी परिणाम होऊन ते उद्योग बंद करू शकतील वा कामगार कायद्यानुसार संघटीत उद्योगातील मिळणारे लाभ कामगारांना देण्यापासून वंचित ठेवतील.विडी उद्योगाची शास्वती धोक्यात येऊन संघटीत विडी कामगारांना केंद्रीय श्रममंत्रालयाच्या माध्यमातून कामगार कायद्याचे लाभ मिळणार नाहीत. सेवा, सानुग्रह अनुदान, हक्क रजा, भविष्य निर्वाह निधी या सामाजिक सुरक्षतेचे कवच नष्ट होईल.

आज भारतात जवळपास या उद्योगावर १ कोटी कामगार असून महाराष्ट्रात ४ लाखाच्या घरात कामगारांचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. २०१६ पासून केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या वतीने विडी कामगारांना मिळणाऱ्या सवलती बंद करून ते सामान्य कोट्यातून देण्याचे प्रयोजन केले. भारत सरकार तंबाखूमुक्त भारत करण्याच्या अनुषंगाने या उद्योगावर मागील एक दशकापासून गंडांतर आलेले असून या उद्योगावर काम करणाऱ्या कामगारांना पयार्यी रोजगार देणारे उद्योग नसल्या कारणाने तात्पुरत्या स्वरूपाचे अभयदान लढ्याच्या माध्यमातून मिळत राहिले. विडी उद्योग हे पूर्व भागातील महिलांच्या रोजगाराचे एकमेव साधन आहे. कोणत्याही परिस्थिती या उद्योगाला नख लागू देणार नाही आणि उद्योग बंद पडू देणार नाही. अशी सिंहगर्जना विडी कामगारांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली.

शनिवार दिनांक 28 सप्टेंबर रोजी दत्तनगर येथील संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय येथे कॉ.मीनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष यशोदा दंडी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी व्यासपीठावर यशोदा दंडी, यमुना सामल, नसीमा पठाण, विजयालक्ष्मी महेशन, वसीम मुल्ला, राजेंद्र गेंट्याल, वीरेंद्र पद्मा आदींची उपस्थिती होती.

यावेळी सिटू चे राज्य महासचिव अँड एम एच शेख, माजी नगरसेविका कॉ.नसीमा शेख आदींनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे व्यवस्थापक गजेंद्र दंडी यांनी वार्षिक जमा खर्च लेखापरीक्षण अहवाल सादर करून वार्षिक सर्वसाधारण सभेतील उपस्थित सभासदांनी एकमताने मंजूरी दिली.

प्रास्ताविक कॉ.वसीम मुल्ला यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अँड अनिल वासम यांनी केले.

# स्व.लतादीदी मंगेशकर यांच्या जयंती निमित्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पांजलीने अभिवादन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** भारतरत्न, गानसम्राज्ञी स्व.लतादीदी मंगेशकर यांच्या जयंती निमित्त, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पांजलीने अभिवादन करण्यात आले. स्व.भारतरत्न, गानसम्राज्ञी, लतादिदी मंगेशकर यांचे अन्नछत्राचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराजांवर अगदी पुत्रवत प्रेम होते. त्यांची छत्रपतींच्या घराण्यावर उदंड श्रध्दा होती. त्या वेळोवेळी अन्नछत्रास मदत करीत व सदैव मार्गदर्शन करीत होत्या. स्व.लतादीदीनी त्यांच्या स्वामीगीतांच्या लाखो सिडी अन्नछत्रास मोफत दिल्या आहेत. त्या नेहमी अन्नदानास देणगी देऊन मदत करीत होत्या.

न्यासाच्या परिसरातील शिवसृष्टी व शिवचरित्र धातुशिल्प ही संकल्पना त्यांचीच आहे. तसेच त्यांनी स्वतःच्या महागड्या गाड्या (मर्सिडीज व शोव्हरलेट) जन्मेजयराजे यांना भेट म्हणून दिल्या आहेत. त्यांचा आणि त्यांच्या सर्व परिवारांशी जन्मेजयराजे यांचा नेहमीच सुसंवाद होता. पं. हृदयनाथजी मंगेशकर, उषाताई मंगेशकर, मीनाताई खडीकर, आशाताई भोसले यांचेशी महाराजांची खूप जवळीक आहेत.

मीनाताई मंगेशकर – खडीकर लिखीत मोठी तिची सावली ह्या लतादिदींच्या आत्मचरित्रपर ग्रंथामध्ये जन्मेजयराजे भोसले यांचा उल्लेख घरातील माणसे असा केले आहेत. जन्मेजयराजे भोसले महाराज हे अन्नछत्रास येणाऱ्या भक्तांची खूप संवेदनाक्ष आहेत. अन्नछत्रात येणाऱ्या स्वामीभक्त हा स्वामी रूप असून, त्यांच्या रुपात श्री स्वामींचा आशीर्वाद हे अन्नछत्रासाठी तारक आहे अशी स्व.लतादीदिंची श्रद्धा होती.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, सिध्दाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, अभियंता अमित थोरात, रोहन शिर्के, योगेश कटारे, चंद्रकांत हिबारे, निखील पाटील, गोटू माने, प्रविण घाडगे, दत्ता माने, मल्लिनाथ कोगनुर, प्रकाश पांढरे, काशिनाथ वाले, शिवू स्वामी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

